# <u>सेवक वार्ता</u>

e-mail : http://www.mahasevak.com

अंक ५, वर्ष - २ मार्च २०२१

**सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, पुणे**

**नोंदणीकृत कार्यालय -ब-८, सारसनगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२**

**संपादकिय** – या महिन्यातील मुख्य घडामोडी म्हणजे २१ मार्च रोजीची वार्षिक सभा. अनेक दिवसांपासून वार्षिक सभेबाबत चर्चा होत होती. ही सभा नागपूर येथे घेण्याचेही निश्चित झाले होते. मात्र कोविड -१९ चे पार्श्वभूमीवर व त्यातही नागपूर हे याबाबतीत संवेदनशील ठरत असल्याने हा विचार सोडून ही सभा आभासी पध्दतीने दि.२१ मार्च जागतीक वन दिनी संपन्न झाली. सेवकच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडले.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील फुलोरा आलेल्या बांबुचे व्यवस्थापनाचे काम सेवकला मिळाले. हा ही सेवकचे इतिहासातील मैलाचा दगड म्हणावा लागेल. याबाबत समझोता लेखावर स्वाक्षरी झाल्या असून इतर कामाप्रमाणेच हे कामही वेळेत व योग्य प्रकारे पूर्ण होईल यात शंका नाही. या कामाचे पुढाकाराबद्दल श्री. वि.त्र्यं. पत्की यांचे हार्दिक आभार व या कामात सहभागी चमुस त्यांच्या कामासाठी हार्दिक शुभेच्छा !

## सेवकची फेब्रुवारी मधील मासिक सभा २ फेब्रुवारी रोजी संपन्न

ही आभासी सभा ११ वा. सुरु झाली. सभेस अध्यक्ष श्री.शिरीष अस्थाना, कार्यकारी अध्यक्ष डॉ. शे.हिं. पाटील, जेष्ठ सदस्य श्री वि. त्र्यं. पत्की, श्री. गिरीष वशीष्ठ (नागपूर) श्री. ठाकरे (ठाणे) श्री. उमेश धोपेश्वरकर श्री.संजय जगताप (अमरावती), श्री. संभाजी गवळी (धुळे) श्री.विवेक डावरे हे हजर होते. दुसऱ्या सत्रात तांत्रिक अडचणीमुळे सर्व सदस्य हजर राहु शकले नाही.

१. या सभेत श्री. पत्की यांनी महाराष्ट्र राज्य बांबु मंडळामार्फत केलेल्या बांबू रोपवनांचे मुल्यांकनाचे कामांच्या प्रगतीबाबत तसेच कामाचे मानधनाबाबत माहिती दिली.

२.अमरावती वृत्ताचे ४९,००० रु येणे रकमेबाबत व धुळे वृत्ताचे ७०,००० येणे रकमेबाबत संबंधितांनी माहिती दिली. याबाबत संबंधितांकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

३. वार्षिक सर्वसाधारण सभा नागपूर येथे दि. २० मार्च रोजी घेण्याचे उरले.

४. डॉ.शे.हिं. पाटील यांनी कै. श्री. गोगटे यांची स्मरणिका दि. २१ मार्च रोजी विमोचीत करण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले.

यावेळी जानेवारी महिन्याचे सेवक वार्ता प्रकाशित झाल्याची घोषणा अध्यक्षांनी केली.

५. सेवक संघाची रजत जयंती २०२२ मध्ये साजरी करण्याचे सर्व सदस्यांनी मान्य केले. या चर्चेनंतर सभा संपल्याची घोषणा झाली.

## सेवकची मार्चमधील मासिक सभा २ मार्च रोजी संपन्न

मार्च मधील या आभासी सभेस, शिरीष अस्थाना, डॉ. शे. हिं. पाटील, श्री. वि.त्र्यं., पत्की, श्री. वसंत जोशी, श्री.संभाजी गवळी, श्री. शिवाजी भगत, श्री. राजेंद्र कदम, श्री. विवेक डावरे, श्री. उमेश धोपेश्वरकर व श्री. गिरीष वशीष्ठ हे सदस्य हजर होते.

१.सुरुवातीस श्री. वि.त्र्यं.पत्की यांनी बांबू मुल्यांकनाचे क्षेत्रिय काम पुर्ण झाले असून मसुदा अहवाल पुर्ण झाल्याचे व माहितीचे विश्लेषण सुरु असल्याचे सांगितले.

२. श्री. गोगटे स्मरणिकेबद्दल ३८ आठवणी प्राप्त झाल्या असून आणखी किमान २ आठवणी प्राप्त होतील असे डॉ. शे. हिं. पाटील यांनी सांगितले. हे सर्व श्री. पत्की यांचेकडे पाठविले असून ते यावर पुढे काम करीत आहेत अशी माहिती दिली. या पुस्तकाचे किमान १०० पृष्ठे होतील असेही त्यांनी सांगितले. १०० प्रतींसाठी १५००० रु., २०० प्रतींसाठी १८००० रुपये ३०० प्रतींसाठी २००० रुपये व ५०० प्रतींसाठी २३००० रुपये खर्च अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. यावर ५०० प्रती छपाईचा निर्णय अध्यक्षांनी घेतला.

३.श्री. भोसले यांचे वृक्षधन हे पुस्तक छपाईवाला आजारी असल्याने १५ मार्चपर्यंत पुर्ण होईल अशी माहिती श्री. शिवाजी भगत यांनी दिली.

४. सेवकचे घडीपत्रक तयार झाल्याचे व त्यांचे वितरण वृत्तस्तरावर होत असल्याचे सांगण्यात आले.

५. कोविड – १९ चे पार्श्वभूमीवर सेवकची वार्षिक सर्वसाधारण सभा आभासी पध्दतीनेच २१ मार्च रोजी ११ वा. घेण्याचे ठरले.

६. चंद्रपूर वृत्ताचे कार्यकारीणी नव्याने तयार झाल्याचे सांगण्यात आले. यानंतर सेवक पुणे चे बदल अहवाल इ. विषयाबाबत चर्चा होऊन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**सेवक चंद्रपूर शाखेचे पुनर्गठण**

सेवक शाखेचे दि. २७ फेब्रुवारीचे बैठकीत पुनर्गठण करण्यात आले असून श्री. विजय खनके हे नविन सहअध्यक्ष असतील. श्री. उरकुडे हे उपाध्यक्ष, श्री. मेश्राम हे सचिव, श्री. सुर्यनारायण बत्तुलवार हे सहसचिव व श्री.तम्मीवार हे कोषाध्यक्ष असतील नवनियुक्त कार्यकारीणीचे हार्दिक अभिनंदन व त्यांचे पुढील कामास हार्दिक शुभेच्छा !



**सेवकची २४वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न**

सेवकची वार्षिक सर्वसाधारण सभा आभासी पध्दतीने (गुगल मिट) दि.२१ मार्च रोजी सकाळी पार पडली. सभेस अध्यक्ष श्री. शिरीष अस्थाना, कार्यकारी अध्यक्ष डॉ. शेषराव हिं.पाटील, सर्वश्री शिवाजी भगत, गिरीष वाशिष्ठ, अनिल ठाकरे, मदन कुलकर्णी, उमेश धोपेश्वरकर, प्रकाश कुकडोलकर, बळवंत सेलुकर, वसईकर, जी.सी. मेश्राम, शंकर खुपसे, गंगाधर निकम, प्रभाकर वाघ, रामचंद्र मोरे, प्रविण डोंगरखेडकर, बाळकृष्ण छल्लारे, पुंडलिक उरकुडे आणि विवेक डावरे असे २४ सदस्य उपस्थित होते.

१. सेवकचे दिवंगत सदस्य कै. श्री. माधव गोगटे, विजय भोसले, व्हि. के. सामंत, संस्थापक सदस्य श्री. सावंत श्री, एस. एन. बांडे, वैद्य, गाडबैल, शंकर वाहणे इ. श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

२.अध्यक्ष श्री. अस्थाना यांनी स्वागतपर भाषणात सेवकचा थोडक्यात इतिहासाचा उल्लेख केला व या संस्थेचे पुढच्या वर्षि २०२२-२३ रजत जयंती वर्षात पदार्पण करीत असल्याचा गौरवपुर्ण उल्लेख केला सर्व सदस्यांनी आणखी उमेदीने काम करण्याचे आवाहन केले व मनोगत संपविले.

३. सभेत २३व्या सभेचे वृत्तांतास मान्यता देणे, २०१९-२० चे लेखा परिक्षणास मंजुरी इ. औपचारिकता पुर्ण करण्यात आलया.

४.श्री. वि.त्र्यं.पत्की यांनी संघाचे कामाचा मागोवा घेतला. सेवकचे पुढील वर्षीचे रजत महोत्सवी वर्षातील कार्यक्रमाचे नियोजनही यावेळी करण्यात आले.

५. कार्यकारी अध्यक्ष डॉ. शे. हिं.पाटील यांनी १९९७ पासून संघाच्या संस्थापक सदस्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे या छोटयाशा रोपटयाचे वृक्षात रुपांतर होत असून पुढील वर्षी रजत जयंती साजरी करीत आहोत ; सर्व सदस्यांनी मेहनत घेतल्यास आपण आणखी प्रगती करु शकू असे त्यांनी सांगितले. आपण आपल्या कामांचा विस्तार करुन वनविभाग व महाराष्ट्र लोक सेवा आयोगासाठी वने विषयावर वर्ग घेऊन मार्गदर्शन करु शकतो. वनविभागाचे सर्व वन व पर्यावरण विषयक कार्यक्रमांना संघाचे प्रतिनिधी म्हणून हजर राहणे, उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करुन त्यांचा उत्साह वाढविणे ही कामे करता येतील. सध्या सेवकची रु. १० लक्ष गंगाजळी रु. १ कोटी पर्यंत नेण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. सर्व सदस्यांना त्यांच्या कामासाठी शुभेच्छा व्यक्त करुन आपले मनोगत पुर्ण केले. यासोबतच इतर विषयाबद्दल चर्चा झाली वृत्ताचे सहअध्यक्षांनीही त्यांचे वृत्तांचे कामाबाबत अहवाल मांडले. श्री. संभाजी गवळी यांनी आभार प्रदर्शन करुन अध्यक्षांचे अनुमतीने सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**डॉ. शेषराव पाटील महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष**

सेवकचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. शे. हिं.पाटील यांची महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष म्हणून ३ वर्षांसाठी नेमणूक झाली आहे. दि. २२ मार्च २०२१ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे नेमणूक झाली आहे. सेवकचे अध्यक्ष श्री. शिरीष अस्थाना व सर्व कार्यकारी सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील सार्वत्रिक बांबू फुलोऱ्याचे व्यवस्थापनाचे काम सेवककडे**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील सार्वत्रिक बांबू फुलोऱ्याचे व्यवस्थापनाचे काम सेवककडे आले असून अलिकडेच म्हणजे दि. २६/०३/२०२१ रोजी क्षेत्र संचालक श्री. जितेंद्र रामगावकर व सेवकचे पथक प्रमुख श्री. संभाजी गवळी यांनी चंद्रपूर मुक्कामी या करारावर स्वाक्षरी केल्या आहेत.




**समझोता अभिलेख**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात बांबूच्या व्यापक फुलोरा येणाच्या क्रियेस सुरुवात झाली असून सुमारे ३०

टक्के क्षेत्रात फुलोरा आला आहे असा प्राथमिक अंदाज आहे. इतर क्षेत्रात सुध्दा ही क्रिया लवकरच सुरु होईल असा अंदाज आहे. व्यापक फुलोरा आल्यानंतर बांबूचे कंद निष्क्रीय होऊन मरण पावतात आणि पूर्ण रांझीतील बांबू सुकून जातात. हे सुकलेले बांबू वन वणव्याचे भक्षस्थानी सहजरित्या पडतात तसेच त्याचा परिणाम परिसर बदल व वन्यप्राणी हालचाल यांचेवर होतो. हे विचारात घेऊन, त्याचे नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. हे काम कष्टाचे तांत्रिक ज्ञानाचे व अनुभवाचे आहे करिता या कामासाठी योग्य सल्ला देणाया यंत्रणेची आवश्यकता व्याघ्र प्रकल्प व्यवस्थापनास होती. सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ महाराष्ट्र या अशासकीय यंत्रणेने हे काम पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेऊन सहकार्याचा हात पुढे केला त्याचा स्विकार करुन व्यवस्थापनाने हे काम संयुक्तीकरित्या पार पाडण्याचे ठरविले. म्हणून हा समझोता अभिलेखा केला आहे. यापुढे पक्ष-१ म्हणून क्षेत्र संचालक ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर, पक्ष-२ म्हणून सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र (सेवक) स्थित पुणे असे संबोधण्यात येईल.

समझोता अभिलेखाच्या प्रमुख तरतुदी पुढील असतील.

१. कार्यक्षेत्र पक्ष-१चे नियंत्रणाखाली असलेले वन आणि वनेत्तर क्षेत्र असेल.

२. व्यापक बांबू फुलोरा आलेल्या व येणाऱ्या क्षेत्राचे व्यवस्थापन करण्यासाठी नीती, धोरण व व्यूह निश्चित करुन नियोजन आराखडा तयार करणे.

३. नियोजन आराखडयात पुढील बाबींवर लक्ष्य केंद्रित केले जाईल.

३.१ बांबूची तोड, निकाशी आणि विल्हेवाट

३.२ आगीपासून संरक्षण उपाययोजना

३.३ बांबूची नैसर्गिक व कृत्रित पुनरुत्पत्ती, बांबू बीज संकलन व वाटप

३.४ वन्यजीव संरक्षण व आश्रयस्थळ व्यवस्थापन

३.५ पर्यटन नियंत्रण, नियमन आराखडा निर्मिती

४. आराखडा निर्मितीसाठी क्षेत्रीय माहिती संकलीत करणे

५. विविध माहिती नमुने, पत्रके, नकाशे तयार करणे

६. पक्ष-२ चे चंद्रपूर स्थित सदस्य यांना क्षेत्रीय माहिती संकलीत करण्यासाठी वाहतूक निवास व्यवस्था पक्ष-१ ने पुरविणे

७.या कामाचे एकूण शुल्क रु.चार लाख, पक्ष-१ने, पक्ष-२ ला चार हप्त्यात वितरीत करणे

७.१ पहिला हप्ता २५ टक्के रु. १ लाख, समझोता अभिलेखा स्वाक्षांकित झालेनंतर ७ दिवसात

७.२ दुसरा हप्ता २५ टक्के रु. १ लाख, पक्ष-२ ने प्राथमिक क्षेत्रसर्वेक्षण केल्यानंतर दोनही पक्षांना मान्य, कामाचे वेळापत्रक तयार केल्यानंतर सात दिवसात

७.३ तिसरा हप्ता २५ टक्के रु. १ लाख, क्षेत्रिय काम पूर्ण करुन प्राप्त माहितीचे विष्लेषण केल्यानंतर १५ दिवसात

७.४ चौथा हप्ता २५ टक्के रु. १ लाख, अहवाल पक्ष-१ यांना सादर केल्यनंतर १५ दिवसात

८. प्रत्येक हप्त्यासोबत पक्ष-१ ने पक्ष-२ ला १८ टक्के सेवा शुल्क रक्कम वितरीत करावी लागेल. सदरहू समझोता अभिलेखा दोनही पक्षांना मान्य आहे.

**सेवकचे घडीपत्रक प्रकाशित**




**काही सदस्यांनी बांबू मुल्यांकनाचे क्षेत्रिय कामातील त्यांचे अनुभव कळविले आहेत ते पुढे देत आहोत.**

१.श्री. संभाजी गवळी यांनी कोंढावळ ता. शहादा जि. नंदुरबार येथील देवेंद्र राजाराम चौधरी यांनी लावलेली बांबु रोपे ३ मिटर पर्यंत उंच वाढल्याचे कळविले आहे. लाभार्थीने रोपांना ठिबक सिंचनाची सोय केली आहे. यात तुरीचे आंतरपिक घेतलेले आहे.




२. श्री. सुधाकर डोळे यांनी टाकरखेडा ता. जामखेड जि. जळगाव बांबुसा बालकोवा या प्रजातींची २ हेक्टर क्षेत्रावर लावलेल्या ८०० रोपांची माहिती कळविली आहे. या रोपवनात विशेष लक्ष देऊन वेळेत सर्व कामे केल्याने रोपांची वाढ ३ मिटरपर्यंत दिसत आहे.



३. श्री. रामचंद्र मोरे यांनी पेठ तहसीलच्या मौ. उंबरपाडा येथे राहणारे सेवानिवृत्त वनपाल श्री.उमाजी रावजी बाराईत यांच्या रोपवनाबाबत माहिती कळविली आहे. श्री. बाराईत यांनी या योजनेंअंतर्गत स्वत:च्या शेतात बांबू रोपवन करुन इतरांसाठी मार्गदर्शक ठरणारे १०० टक्के झाडे जीवंत व सशक्त असणारे मॉडेल तयार केले एवढेच नव्हे तर योजनेची परिपूर्ण माहिती घेऊन तहसिलमधील २८४ लाभार्थ्यांना अर्ज करण्यापासून संपूर्ण मार्गदर्शन केले.



**श्री.संभाजी गवळी यांचे रोटरी क्लबच्या रोपवनास तांत्रिक मार्गदर्शनाबद्दल आभार**



Rotary Rotary Opens Opportunities

District 3030
Club No. 55327

ROTARY CLUB OF NASIK RIVERSIDE

President
Rtn. Deepak Kulkarni
E-mail : rcnashikriverside@gmail.com
Mob.: 9834909122

Secretary
Rtn. Sanjay Kulkarni
E-mail : spkulkarni.packaging@gmail.com
Mob.: 9011001962

Treasurer
Rtn. Ravindra Vibhandik
E-mail : Ravindra@vibhandik.com
Mob.: 7875559283

31 March 2021

The President,
Sevak Sangh Maharashtra,
Pune

Subject: Technical Guidance and Support by Shri S K Gawali

Dear Sir,

Our Organisation, The Rotary Club of Nashik Riverside is having a thrust on environmental improvement.

NMC has allocated the following areas for development of gardens. Tree Plantation and Maintainance of Gardens.

1.Aushadhi Vanaspati Udyan ,Near Bapu Bungalow indiranagar

2. Plot near Library, Shiv Colony , Pandav Nagari Off Pathardi Road.

3. Plot Near Garden Colony.

In this social and environmental protection work, we seek support from various agencies for the Technical assistance.

We are pleased to inform you that we have received technical guidance and support from Shri S K Gawali, Vice President, Sevak Sangh for The preparation of Soil, Layout of the Gardens, Selection of the plants, Identification of the existing plants.

We gratefully acknowledge the assistance provided to us without any financial burden and totally Free of Cost. .

Thanking you for the help extended to us. .

Deepak Kulkarni,
President,
Rotary club Of Nashik Riverside

**सेवक औरंगाबादचे पुनर्गठण**

दि. १४ मार्च २०२१ रोजी सेवक औरंगाबाद विभाग संघटनेची आभासी सभा स. ११ वा. घेण्यात आली. सभेस श्री. आर. एस. धोंगडे, अध्यक्ष, श्री. चोले, श्री. एस.डी. धर्माधिकारी, श्री. शरद बावसकर, श्री. आर. एन. वाघमारे, श्री. एस. डी. पांडे, श्री. एस. डी.खुपसे, श्री. ए.बी. पांडे हे हजर होते.

श्री.आर.एस. धोंगडे, विद्यमान अध्यक्ष यांचे संमतीने औरंगाबाद विभागाची सेवक संघटनेची नुतन कार्यकारीणी नियुक्तीबाबतचा विषय श्री.एस.डी. धर्माधिकारी यांनी मांडला. विषयावर साधक बाधक चर्चा होऊन सर्वानुमते खालील कार्यकारीणी नियुक्तीची घोषणा करण्यात आली.

नवनियुक्त कार्यकारीणी -

१.श्री. एस.डी. धर्माधिकारी, अध्यक्ष 9420812322
२. श्री. एस.डी. खुपसे, उपाध्यक्ष 9922684750
३. श्री. आर. एन. वाघमारे, कोषाध्यक्ष 9423274509
४.श्री. शरद बावस्कर, सहकार्यवाह 9420672068
५. श्री. एस.डी. पांडे , सचिव 9421867916

---

प्रकाशक : सेवक, पुणे
संपादन : डॉ. शे. हिं. पाटील, भावसे (सेवानिवृत्त) प्रधान मुख्य वनसंरक्षक